# मुंबई विद्यापीठ

**महाराष्ट्र सार्वजनिक विद्यापीठ अधिनियम, २०१६, कलम ३०(४)(च)(f),(छ)(g),(ज)(h) व (झ)(i) नुसार अधिसभेचे सदस्य असलेल्या प्राचार्य, अध्यापक व विद्यापीठ अध्यापक, व्यवस्थापन प्रतिनिधी व नोंदणीकृत पदवीधर यांच्यामधून व्यवस्थापन परिषद सदस्य पदाचीनिवडणूक.**

## निवडणूक अधिसूचना

**महाराष्ट्र सार्वजनिक विद्यापीठ अधिनियम, २०१६, कलम ३०(४)(च)(f),(छ)(g),(ज)(h) व (झ)(i) नुसार अधिसभेचे सदस्य असलेल्या प्राचार्य, अध्यापक व विद्यापीठ अध्यापक, व्यवस्थापन प्रतिनिधी व नोंदणीकृत पदवीधर यांचे प्रत्येकी दोन सदस्य अधिसभेच्या बैठकीत व्यवस्थापन परिषदेवर सदस्य म्हणून निवडून द्यावयाचे आहेत. दिनांक २१ जुलै, २०१८ रोजी आयोजित केलेल्या अधिसभेच्या बैठकीत होणाऱ्या निवडणुकीसाठी दिनांक १७ मे, २०१७ रोजी महाराष्ट्र शासनाने राजपत्राद्वारे प्रसिध्द केलेल्या सन २०१७ चा एकरूप परिनियम क्रमांक ०१ मधील मुद्दा क्रमांक ०९ (२) नुसार ही निवडणूक सूचना देण्यात येत आहे.**

१) प्राचार्य : दोन जागा पैकी एक खुला व एकविमुक्त जाती व भटक्या जमाती (DT/NT)राखीव
२) अध्यापक व विद्यापीठ अध्यापक : दोन जागा पैकी एक खुला व एक अनुसुचित जमाती (ST)राखीव
३) व्यवस्थापन प्रतिनिधी : दोन जागा पैकी एक खुला व एक अनुसुचित जाती (SC)राखीव
४) नोंदणीकृत पदवीधर : दोन जागा पैकी एक खुला व एक इतर मागासवर्ग (OBC)राखीव

**<u>अधिसभेच्या बैठकीतील निवडणूक कार्यक्रम खालीलप्रमाणे :—</u>**

| अनु. क्र. | तपशील | तारीख, वार व वेळ | स्थळ |
|---|---|---|---|
| १] | उमेदवारी अर्ज सादर करण्याचा अंतिम दिनांक, वार व वेळ (सन २०१७ चा एकरूप परिनियम क्रमांक १(१०)(२)(क) नुसार निवडणूकीच्या दिनांकाच्या पूर्ण १० दिवस अगोदर) | मंगळवार, दि. १० जुलै, २०१८ (वेळ : सायंकाळी ५.०० वाजेपर्यंत) | निवडणूक विभाग, कक्ष क्र.११०, पहिला मजला, मुंबई विद्यापीठ, फोर्ट, मुंबई — ४०० ०३२. |
| २] | उमेदवारी अर्जाच्या छाननीचा दिनांक, वार व वेळ | बुधवार, दि. ११ जुलै, २०१८ (वेळ : सकाळी ११.००वाजता) | फिरोजशाह मेहता सभागृह (व्यवस्थापन परिषदेचे दालन), मुंबई विद्यापीठ, कक्ष क्र. १०५, फोर्ट, मुंबई — ४०० ०३२. |
| ३] | उमेदवारी अर्ज मागे घेण्यासंबंधी लेखी कळविण्याचा दिनांक, वार व वेळ (सन २०१७ चा एकरूप परिनियम क्र. १ मधील मुद्दा क्र. १०(५) नुसार) | गुरूवार, दि. १२ जुलै, २०१८ (वेळ : सायंकाळी ५.०० वाजेपर्यंत) | निवडणूक विभाग, कक्ष क्र.११०, पहिला मजला, मुंबई विद्यापीठ, फोर्ट, मुंबई — ४०० ०३२. |
| ४] | निवडणूक लढविणाऱ्या उमेदवारांची यादी जाहीर करण्याचा दिनांक व वार (सन २०१७ चा एकरूप परिनियम क्र. १ मधील मुद्दा क्र. ९(२) नुसार) | शुक्रवार, दि. १३ जुलै, २०१८ | विद्यापीठाच्याwww.mu.ac.inच्या election portal किंवा www.musenate.inया अधिकृत संकेतस्थळावर उपलब्ध आहेत |
| ५] | मतदान आणि मतमोजणी दिनांक | शनिवार, दि. २१ जुलै, २०१८ (मतदानाची वेळ संपल्यानंतर अर्ध्या तासानंतर) | दीक्षांत सभागृह, मुंबई विद्यापीठ, फोर्ट, मुंबई - ४०० ०३२ |

६] महाराष्ट्र सार्वजनिक विद्यापीठ अधिनियम, २०१६, कलम ३०(४)(च), (छ), (ज) व (झ) **[30(4)(f), (g), (h) & (i)]**व महाराष्ट्र शासन राजपत्र असाधारण भाग चार – ब, दिनांक २८ एप्रिल, २०१७ अन्वये विद्यापीठाच्या कोणत्याही प्राधिकरणाचा सदस्य म्हणून निवडून येण्याच्या, नामनिर्देशित करण्याच्या अथवा स्वीकृत करून घेण्याच्या पात्रता शर्ती विनिर्दिष्ट करण्यात आलेल्या आहेत. या पात्रता शर्तीच्या अनुसूचि एक मधील तरतुदीनुसार प्राचार्य, अध्यापक व विद्यापीठ अध्यापक, व्यवस्थापन प्रतिनिधी व नोंदणीकृत पदवीधर यांच्यामधून व्यवस्थापन परिषदेवर सदस्य म्हणून निवडून येण्यासाठीच्या पात्रता शर्ती खालीलप्रमाणे आहेत.

**i) महाराष्ट्र सार्वजनिक विद्यापीठ अधिनियम, २०१६, कलम ३०(४)(च), [30(4)(f)] मधील तरतुदीनुसार अधिसभेमधून अधिसभेचे सदस्य असलेल्या प्राचार्यामधून दोन प्राचार्यांची व्यवस्थापन परिषदेवर निवडणूक.**

30(4)(f) : two principals to be elected by the Senate from amongst the principals who are the members of the Senate, out of whom one shall be elected from amongst the principals who have been elected from Scheduled Castes or Scheduled Tribes or De-notified Tribes *(Vimukta Jatis)* or Nomadic Tribes or Other Backward Class categories, by rotation;

एकूण जागा :०२ **{एक जागा : खुला व एक जागा : विमुक्त जाती व भटक्या जमाती (DT/NT)}**

**शासन आदेश क्र. संकीर्ण–२०१६/(३४७/१६)/विशि.३, दि. २८ एप्रिल, २०१७ अन्वये उमेदवारांसाठी आवश्यक पात्रताशर्ती खालीलप्रमाणे :–**

**अधिसभेचे सदस्य असतील अशा प्राचार्यांमधून अधिसभेने निवडून दिलेले.**

**क)** उमेदवार हा प्राचार्य म्हणून दि. १३ ऑक्टोबर, २००० पूर्वी नियुक्त नसल्यास पीएच.डी. पदवीधारक असावा.

**ख)** विद्यापीठाच्या परीक्षांशी संबंधित कामकाज एकूण किमान पाच वर्ष केलेले असावे.

**नामनिर्देशन पत्रासोबत जोडावयाची कागदपत्रे (साक्षांकित प्रती)**

१. उमेदवार हा प्राचार्य म्हणून दि. १३ ऑक्टोबर, २००० पूर्वी नियुक्त नसल्यास पीएच.डी. पदवी प्रमाणपत्र
२. प्राचार्य म्हणून विद्यापीठ मान्यता पत्राची प्रत / प्रती
३. मागासवर्गीयाकरीता राखीव असलेल्या जागेसाठी सक्षम अधिकाऱ्याने दिलेले जातीचे प्रमाणपत्र. (Cast Certificate)
४. विद्यापीठाच्या परीक्षांशी संबंधीत कामकाजाचे एकूण किमान पाच वर्षे अनुभवाचे प्रमाणपत्र,
५. नावात बदल असल्यास शासन राजपत्र किंवा विवाह नोंदणी प्रमाणपत्र.

**ii) महाराष्ट्र सार्वजनिक विद्यापीठ अधिनियम, २०१६, कलम ३०(४)(छ), [30(4)(g)] मधील तरतुदीनुसार अधिसभेमधून अधिसभेचे सदस्य असलेल्या अध्यापक व विद्यापीठ अध्यापक (जे प्राचार्य किंवा मान्यताप्राप्त परिसंस्थेचे संचालक नाहीत) यांमधून दोन जागांसाठी व्यवस्थापन परिषदेवर निवडणूक.**

30(4)(g) : two teachers who are not principals or directors of recognised institutions to be elected by the Senate from amongst the teachers and university teachers who are the members of the Senate, out of whom one shall be elected from amongst the teachers and university teachers who have been elected from Scheduled Castes or Scheduled Tribes or De-notified Tribes *(Vimukta Jatis)* or Nomadic Tribes or Other Backward Class categories, by rotation

एकूण जागा : ०२ **{एक जागा : खुला व एक जागा अनुसुचित जमाती (ST)}**

..३/—

**शासन आदेश क्र. संकीर्ण-२०१६/(३४७/१६)/विशि.३, दि. २८ एप्रिल, २०१७ अन्वये उमेदवारांसाठी आवश्यक पात्रता शर्ती खालीलप्रमाणे :-**

**अधिसभेचे सदस्य असतील अशा, अध्यापक व विद्यापीठ अध्यापक (जे प्राचार्य किंवा मान्यताप्राप्त परिसंस्थेचे संचालक नाहीत) यांमधून अधिसभेने निवडून दिलेले.**

**क)** पीएच.डी. पदवीधारक असावा आणि एकूण किमान दहा वर्षे अध्यापनाचा अनुभव असावा,
**किंवा**
एकूण किमान पंधरा वर्षे अध्यापनाचा अनुभव असावा,
**ख)** विद्यापीठाच्या परीक्षांशी संबंधीत कामकाजाचे एकूण किमान पाच वर्षे केलेले असावे,

**नामनिर्देशन पत्रासोबत जोडावयाची कागदपत्रे (साक्षांकित प्रती)**

१. पीएच.डी. पदवी प्रमाणपत्र, ज्या उमेदवाराचा एकूण किमान दहा (१०) वर्षे अध्यापनाचा अनुभव आहे. ज्या उमेदवाराचा एकूण किमान पंधरा (१५) वर्षे अध्यापनाचा अनुभव आहे त्यांना पीएच.डी. पदवी प्रमाणपत्र जोडण्याची आवश्यकता नाही.
२. एकूण किमान दहा (१०) वर्षे / एकूण किमान पंधरा (१५) वर्षे (जे लागू असेल ते) अध्यापनाच्या अनुभवाचे प्रमाणपत्र. आणि विद्यापीठ मान्यता पत्राची प्रत / प्रती.
३. मागासवर्गीयाकरीता राखीव असलेल्या जागेसाठी सक्षम अधिकाऱ्याने दिलेले जातीचे प्रमाणपत्र. (Cast Certificate)
४. विद्यापीठाच्या परीक्षांशी संबंधीत कामकाजाचे एकूण किमान पाच वर्षे अनुभवाचे प्रमाणपत्र.
५. नावात बदल असल्यास शासन राजपत्र किंवा विवाह नोंदणी प्रमाणपत्र.

**iii) महाराष्ट्र सार्वजनिक विद्यापीठ अधिनियम, २०१६, कलम ३०(४)(ज), [30(4)(h)] मधील तरतुदीनुसार अधिसभेचे सदस्य असलेल्या व्यवस्थापन प्रतिनिधींमधून, परंतु त्याच व्यवस्थापनाकडे लागोपाठ दुसरे संस्थात्मक प्रतिनिधीत्व असणार नाही अशा दोन प्रतिनिधींची व्यवस्थापन परिषदेवर अधिसभेमधून निवडणूक.**

30(4)(h) :two representatives of managements to be elected by Senate from amongst the representatives of management who are members of Senate, and further provided that same management shall not have second consecutive institutional representation:
Provided that, out of the two representatives under this clause, one member shall be elected, by rotation, from amongst the Scheduled Castes or Scheduled Tribes, or De-notified Tribes *(Vimukata Jatis)* or Other Backward Class.

एकूण जागा : ०२ **{एक जागा : खुला व एक जागा :अनुसुचित जाती (SC)}**

**शासन आदेश क्र. संकीर्ण-२०१६/(३४७/१६)/विशि.३, दि. २८ एप्रिल, २०१७ अन्वये उमेदवारांसाठी आवश्यक पात्रता शर्ती खालीलप्रमाणे :-**

**अधिसभेचे सदस्य असतील अशा व्यवस्थापन प्रतिनिधींमधून अधिसभेने निवडून दिलेले :-**

**क)** स्नातक पदवीधारक असावा.
**ख)** व्यवस्थापनाच्या नियामक मंडळाचा/व्यसस्थापन समितीचा किमान दोन वर्ष सदस्य असावा.
**ग)** राष्ट्रीय मुल्यांकन व अधिस्वीकृती परिषदेची किंवा यथास्थिती राष्ट्रीय अधिस्वीकृती मंडळाचे वैध प्रमाणपत्र असलेले किंवा अशा प्रमाणपत्राचा वैधता कालावधी समाप्त झाला नसेल असे किमान एक महाविद्यालय किंवा परिसंस्था अशा व्यवस्थापनाकडून चालविण्यात येणारे असावे.
**घ)** ज्यांचा विद्यापीठ व्यवस्थापन परिषदेच्या लगतपूर्वीच्या व्यवस्थापन परिषदेवर प्रतिनिधी होता अशा व्यवस्थापनाचा प्रतिनिधी नसावा.

**नामनिर्देशन पत्रासोबत जोडावयाची कागदपत्रे (साक्षांकित प्रती)**

१. पदवी प्रमाणपत्र ,(Degree Certificate)
२. व्यवस्थापनाच्या नियामक मंडळाचा/व्यसस्थापन समितीचा किमान दोन वर्ष सदस्य असल्याचे विहित नमुन्यातील प्रमाणपत्र.
३. मागासवर्गीयाकरीता राखीव असलेल्या जागेसाठी सक्षम अधिकाऱ्याने दिलेले जातीचे प्रमाणपत्र.(Cast Certificate)
४. उमेदवार ज्या व्यवस्थापनाचा प्रतिनिधी असेल त्या व्यवस्थापनाकडून चालविण्यात येणाऱ्या किमान एक महाविद्यालय किंवा परिसंस्थेस प्राप्त राष्ट्रीय मुल्यांकन व अधिस्वीकृती परिषदेचे किंवा यथास्थिती राष्ट्रीय अधिस्वीकृती मंडळाचे वैध प्रमाणपत्र

iv) **महाराष्ट्र सार्वजनिक विद्यापीठ अधिनियम, २०१६, कलम ३०(४)(झ), [30(4)(i)] मधील तरतुदीनुसार अधिसभेमधून अधिसभेचे सदस्य असलेल्या नोंदणीकृत पदवीधरांमधून, दोन नोंदणीकृत पदवीधरांची व्यवस्थापन परिषदेवर निवडणूक.**

30(4)(i) : two registered graduates elected by Senate from amongst elected registered graduate members of Senate, out of whom one shall be elected from amongst the registered graduates who have been elected from Scheduled Castes or Scheduled Tribes or De-notified Tribes *(Vimukta Jatis)* or Nomadic Tribes or Other Backward Class categories, by rotation

एकूण जागा : ०२ **{एक जागा : खुला व एक जागा :इतर मागासवर्ग (OBC)}**

**शासन आदेश क्र. संकीर्ण–२०१६/(३४७/१६)/विशि.३, दि. २८ एप्रिल, २०१७ अन्वये उमेदवारांसाठी आवश्यक पात्रता शर्ती खालीलप्रमाणे :–**

**अधिसभेच्या निवडून दिलेल्या नोंदणीकृत पदवीधर सदस्यांमधून अधिसभेने निवडून दिलेले:–**

७] विहित नमुन्यातील नामनिर्देशन अर्जविद्यापीठाच्याwww.mu.ac.inच्या election portal या अधिकृत संकेतस्थळावर विनामुल्य उपलब्ध आहेत.

८] नामनिर्देशनपत्रांवर, मत देण्यासाठी हक्कदार असलेल्या दोन मतदारांकडून दिनांक लिहून स्वाक्षरी करण्यात येईल आणि त्यामध्ये, दिनांक, नामनिर्देशित केलेल्या उमेदवारांची पूर्ण नावे, पत्ते व पदनामे, कोणतीही असल्यास, आणि स्वाक्षरीकर्त्या मतदारांचा व नामनिर्देशित उमेदवारांचा मतदार क्रमांक यांचा समावेश असेल. कोणत्याही व्यक्तीला, त्याने नामनिर्देशन पत्रावर स्वाक्षरी करून व दिनांक लिहून त्याची संमती दिल्याखेरीज निवडणूकीतील उमेदवार म्हणून नामनिर्देशित केले जाणार नाही. कोणतीही व्यक्ती, त्याच्या स्वत:च्या नामनिर्देशनामध्ये एकतर सुचक किंवा अनुमोदक असणार नाही. परंतु, जेथे तीनपेक्षा कमी मतदार असतील तेथे उमेदवार, त्याच्या नामनिर्देशनामध्ये स्वत: सूचक व अनुमोदक असू शकेल. (एकरुप परिनियम क्र. १ मधील मुद्दा क्र. १०(३)).

९] या निवडणूक सूचनेमध्ये नमुद केलेल्या सर्व अटींचे अनुपालन करीत नसलेले नामनिर्देशनपत्र अवैध असेल आणि ते फेटाळले जाईल. (एकरुप परिनियम क्र. १ मधील मुद्दा क्र. १०(४)).

१०] उमेदवारास निवडणुकीतून माघार घेण्याचा पर्याय खुला असेल : परंतु, अशा उमेदवारास निवडणुकीच्या वेळापत्रकास विहित केलेल्या दिनांकास सायंकाळी ५ वाजण्यापूर्वी विद्यापीठाच्या कार्यालयात व्यक्तीश: किंवा त्याने लिखित स्वरूपात प्राधिकृत केलेल्या व्यक्तीमार्फत त्याने स्वाक्षरीत केलेला नामनिर्देशन मागे घेतल्याचा अर्ज सादर करावा लागेल. (एकरुप परिनियम क्र. १ मधील मुद्दा क्र. १०(५)).

११] नामनिर्देशन पत्राच्या वैधतेच्या संदर्भात कोणताही वाद किंवा शंका असल्यास, कुलगुरूंकडे, अपिल करता येईल आणि मा.कुलगुरुंचा निर्णय अंतिम असेल. (एकरुप परिनियम क्र. १ मधील मुद्दा क्र. १०(७)).

..५/—

१२] उमेदवारी मागे घेण्याच्या मुदतीनंतर निवडून द्यावयाच्या जागापेक्षा अधिक उमेदवार नसतील तर ते सर्व उमेदवार, निवडणूकीचा निकाल जाहिर करण्याच्या दिनांकास बिनविरोध निवडून आल्याचे जाहिर करण्यात येईल. (एकरुप परिनियम क्र. १ मधील मुद्दा क्र. १०(८)).

१३] उमेदवारी अर्ज मागे घेण्याच्या मुदतीनंतर निवडून द्यावयाच्या जागापेक्षा जास्त उमेदवार असतील तर अशा उमेदवारांची अंतिम यादी विद्यापीठाच्या www.mu.ac.in. च्या election portal किंवा www.musenate.in या अधिकृत संकेतस्थळावर प्रसिध्द करण्यात येईल.

१४] महाराष्ट्र शासन राजपत्र दिनांक २८ एप्रिल, २०१७ व त्या संदर्भात शासनाने वेळोवेळी केलेली परिपत्रके/पत्र यांच्या अन्वये विद्यापीठाच्या कोणत्याही अधिकार मंडळावर निवडून येण्यासाठी/नामनिर्देशित होण्यासाठी शासनाने विहित केलेल्या पात्रता शर्ती पूर्ण करणा—या उमदवारांचे नामनिर्देशन अर्ज ग्राहय धरण्यात येतील. शासन राजपत्र, शासनाने यासंबंधी वेळोवेळी निर्गमित केलेली परिपत्रके/पत्रे तसेच पात्रता शर्तीच्या ग्राहयतेसंबंधीच्या नियमांबाबतची प्रत विद्यापीठाच्या www.mu.ac.in. च्या election portal किंवा www.musenate.in या संकेतस्थळावरील निवडणूक २०१७ व शासन निर्णय मसमबजपवद या लिंकवर उपलब्ध आहे.

१५] उमेदवारी अर्जासोबत वर नमुद केल्याप्रमाणे आवश्यक त्या कागदपत्रांच्या स्वयं—साक्षांकीत प्रती जोडणे आवश्यक आहे. अन्यथा संबंधीत नामनिर्देशनपत्र 'अवैध' ठरविण्यात येईल (मतदार नोंदणीच्या वेळी जोडलेली कागदपत्रे उमेदवारी अर्जाकरीता ग्राह्य धरली जाणार नाहीत).

१६] उमेदवारी अर्ज छाननीच्यावेळीस्वत: उमेदवार किंवा त्यांने लेखी पत्राद्वारे प्राधिकृत केलेला त्याच मतदार यादीतील मतदार असलेली व्यक्ति प्रतिनिधी म्हणून एक तास अगोदर पूर्वसूचना देऊन ओळखपत्र दाखवून हजर राहू शकेल.(एकरुप परिनियम क्र. १ मधील मुद्दा क्र. १०(६)).

१७] **शनिवार, दिनांक २१ जुलै, २०१८ रोजी दिक्षांत सभागृह, फोर्ट, येथे होणाऱ्या अधिसभेच्या बैठकीत संबंधीत मतदारांनी मतदान करावयाचे आहे. तथापि, अधिसभा सदस्य म्हणून मतदानाच्या अंतिम दिनांकापर्यंत रिक्त असलेल्या जागेवर मा. अधिसभा सदस्य म्हणून नामनिर्देशित करण्यात आलेल्या व्यक्तीस सदर सभेमध्ये मतदार म्हणून मतदानाचा आपला हक्क बजावता येईल.**

१८] **मतदान करण्यास पात्र असलेल्या अधिसभा सदस्यांची यादी सोबत जोडल्याप्रमाणे प्रसिध्द करण्यात येत आहे. तथापि, रिक्त असलेल्या अधिसभा सदस्यांमध्ये नवीन सदस्यांचा (नामनिर्देशित सदस्य) समावेश झाल्यास सदर यादी मतदानापुर्वी अद्ययावत करण्यात येईल, याची सर्व संबंधितांनी नोंद घ्यावी.**

१९] मतदानास येताना मतदारांनी स्वत:चा फोटो असलेले ओळखपत्र उदा. शासकीय/निमशासकीय सेवकांचे कार्यालयीन ओळखपत्र, आधाकार्ड, पारपत्र, वाहन चालविण्याचा परवाना (ड्रायव्हींग लायसेन्स) किंवा सर्वसाधारण निवडणुकीसाठी सक्षम प्राधिकाऱ्यांनी दिलेले फोटोसहीत ओळखपत्र किंवा आयकर अधिकाऱ्यांनी (Income Tax) दिलेले फोटोसहीत ओळखपत्र (PAN Card) किंवा तत्सम फोटोसहीत ओळखपत्र आणणे आवश्यक आहे. **संबंधित सभासदास / मतदारास ओळखपत्र दाखविल्याशिवाय मतपत्रिका मिळणार नाही**.

२०] ही निवडणूक प्रमाणशीर प्रतिनिधित्व पध्दतीनुसार एकक संक्रमणीय मतानुसार परिनियमांद्वारे विहित केल्याप्रमाणे घेण्यात येईल. या निवडणुकीसाठी मतदान हे पसंतीनुसार प्राधन्यक्रम या पध्दतीने करावयाचे आहे. (एकरूप परिनियम क्र. १ मधील मुद्दा क्र. ५ व ६)

स्वाक्षरीत/—
(डॉ. दिनेश कांबळे)
कुलसचिव तथा निवडणूक निर्णय अधिकारी

क्र. नि.वि./आयसीडी/२०१७—१८/**२३३**/२०१८
दि. : २९ जून, २०१८.

**प्रत : सर्व संबंधित मतदार.**

| मुंबई विद्यापीठ<br>UNIVERSITY OF MUMBAI | नामनिर्देशन अर्ज<br>**NOMINATION FORM** | एन.एफ./ **NF**<br>**COMMON** |
|---|---|---|

महाराष्ट्र सार्वजनिक विद्यापीठ अधिनियम, २०१६, मधील कलम ______________________________ अन्वये निवडणूकीसाठी विद्यापीठास सादर करावयाची माहिती./ Information to be submitted for the Purpose of election Under Section ______________________________ of the Maharashtra Public Universities Act, 2016.

| | | |
|---|---|---|
| १) कोणत्या मंडळ/प्राधिकरणासाठी उमेदवार निवडणूक लढविण्यास इच्छूक आहे. (कलम)/Name of the Board / Authority to which the Candidate desires to contest the election (Section) | | Photo |
| २) प्रवर्गाचे नाव/Name of the Category / (एकच प्रवर्ग निवड करा/ Mark any Category) | ☐ खुला/General ☐ महिला/Women<br>☐ अनुसूचित जाती/SC ☐ अनुसूचित जमाती/ST<br>☐ विमुक्त जाती/DTNT ☐ इतर मागासवर्गीय/OBC | |

## उमेदवार/Candidate

३) उमेदवाराचे नांव (आडनांव प्रथम)
Name of the Candidate (Beginning with Surname) ______________________________

४) उमेदवाराचे पद (असल्यास)
Designation of the Candidate (if any) ______________________________

५) उमेदवाराचा घरचा पत्ता :-
Residential Address of the Candidate ______________________________

______________________________

६) महाविद्यालयाचे नांव
Name of the College ______________________________

______________________________

______________________________

दुरध्वनी क्रमांक (निवास) ______________ (कार्यालय) ______________ (भ्रमणध्वनी) ______________.

## सूचक/ Proposer

७) सूचकाचे नांव (आडनांव प्रथम)
Name of the Proposer (Beginning with Surname) ______________________________

८) सूचकाचे पद (असल्यास)
Designation of the Proposer (if any) ______________________________

९) सूचकाचा घरचा पत्ता :-
Residential Address of the Proposer ______________________________

______________________________

दुरध्वनी क्रमांक (निवास) ______________ (कार्यालय) ______________ (भ्रमणध्वनी) ______________.

१०) दिनांक / Date :- / / सूचकाची स्वाक्षरी / Signature of Proposer

## अनुमोदक/Seconder

११) अनुमोदकाचे नांव (आडनांव प्रथम)
Name of the Seconder (Beginning with Surname) ______________________________

१२) अनुमोदकाचे पद (असल्यास)
Designation of the Seconder (if any) ______________________________

१३) अनुमोदकाचा घरचा पत्ता :-
Residential Address of the Seconder ______________________________

______________________________

दुरध्वनी क्रमांक (निवास) ______________ (कार्यालय) ______________ (भ्रमणध्वनी) ______________.

१४) दिनांक / Date :- / / अनुमोदकाची स्वाक्षरी / Signature of Seconder

मागे पहा/PTO

# प्रतिज्ञापत्र/Declaration

वरील नामनिर्देशन मी याद्वारे स्वीकृती देत आहे./ I hereby give my consent to the above mentioned Nomination.

स्थळ / Place : __________________

दिनांक / Date : __________________

उमेदवाराची स्वाक्षरी / Signature of the Candidate

---

## भाग १ / Part I

उमेदवाराकडून प्रतिज्ञापत्र:

**महाराष्ट्र सार्वजनिक विद्यापीठ अधिनियम २०१६ मधील कमल ३०(४) नुसार अधिसभेवरील व्यवस्थापन परिषदेवर सदस्यांच्या निवडणूकीसाठी / Election to the Management Council from Senate under section 30(4) of the Maharashtra Public Universities Act, 2016.**

१. मी असे जाहीर करते/करतो की महाराष्ट्र शासनाने अधिसूचना क्रमांक संकिर्ण–२०१६(३४७/१६) वि.शि.–३ दि.२८ एप्रिल, २०१७ अन्वये निश्चित केलेल्या पात्रता शर्ती पूर्ण करते/करतो. (कागदपत्र सलग्न)

२. मी याद्वारे शपथपूर्ण असे जाहीर करते/करतो की, नामनिर्देशन अर्जात दिलेली माहिती सत्य व खरी असून ती खोटी आढळल्यास माझे सदस्यत्व कायद्यान्वये रद्द करावे.

३. माझी उमेदवारी महाराष्ट्र सार्वजनिक विद्यापीठ अधिनियम, २०१६ मधील कलम ६५ यास बंधनकारक आहे.

### Declaration by the Candidates

1. I here by declare that I am fulfilling the Eligibility conditions prescribed by the Goverment of Maharashtra vide no. MNS-2016(347/16)U.E.-3 dated 28th April, 2017.
2. I hereby declare on **oath** that the information given by me in the Nomination Form is true and correct as my best of knowledge and my candidature shall be cancelled as per the Act if the above information is found incorrect.
3. That my candidature is governed by the provisions of Sections 65 of the Maharashtra Public Universities Act, 2016.

मी हे घोषित करते/करतो की रकान्यात नमूद केलेल्या प्रवर्गासाठी मी निवडणूक लढवीत आहे/I hereby declare that I am contesting the election for [ ] प्रवर्गासाठी/CATEGORY (प्रवर्ग नमूद करावे/ Put the category in the box)

प्राचार्य/विभागप्रमुख/संस्थाप्रमुख/अन्य सक्षम प्राधिकारी/एसईओ यांच्याकडून साक्षांकित/Countersigned by the Principal/HOD/Head of the Institution/ other Competent Authority/SEO

उमेदवाराची स्वाक्षरी / Signature of the Candidate

स्थळ / Place: _____________

दिनांक/ Date: ____________

---

## भाग २ / Part II

(कुलसचिव तथा निवडणूक निर्णय अधिकाऱ्याने भरावयाचे / To be filled by Registrar and Returning Officer)

नामनिर्देशन अर्जाचा अनुक्रमांक ______________________ हे नामनिर्देशन उमदवाराने / सुचकाने / अनुमोदकाने माझ्या कार्यालयात दिनांक ___________________रोजी___________________ वाजता माझ्या स्वाधीन केले. / Serial No. of Nomination Form ______________ This Nomination Form has been delivered to me at my office at ________________on _________ date by the *Candidate / Proposer / Seconder.

दिनांक / Date : _________________________

*लागू नसलेले शब्द खोडावे / Strike out the word not applicable

कुलसचिव तथा निवडणूक निर्णय अधिकारी
Registrar and Returning Officer

---

## भाग ३ / Part III

नामनिर्देशनपत्र स्वीकारण्याच्या किंवा नाकरण्याच्या बाबतीत कुलसचिव तथा निवडणूक निर्णय अधिकाऱ्याचा निर्णय.
Decision of Registrar and Returning Officer Accepting or Rejecting the Nomination form.

महाराष्ट्र सार्वजनिक विद्यापीठ अधिनियम २०१६ कलम ३०(४) _____आणि महाराष्ट्र शासनाने अधिसूचना क्रमांक. एमएनएस–२०१६(३४७/१६) वि.शि–३, दिनांक.२८ एप्रिल, २०१७ नुसार मी हे नामनिर्देशन अर्ज तपासले असून माझा निर्णय खालीलप्रमाणे आहे
I have examined this nomination form in accordance with Section 30(4) _________ of the Maharashtra Public Universities Act 2016 and Notification No.MNS-2016(347/16)UE-3, dated- 28 April, 2017 issued by the Government of Maharashtra.

---

दिनांक / Date : _________________________

कुलसचिव तथा निवडणूक निर्णय अधिकारी/
Registrar and Returning Officer

## भाग ४ / Part IV

नामनिर्देशन अर्जाची पावती आणि त्याच्या छाननीची सूचना / Receipt For Nomination Form and Notice of Scrutiny

नामनिर्देशनपत्र सादर करणाऱ्या व्यक्तीच्या स्वाधीन करावे/ To be handed over to the person presenting the nomination form

श्री/श्रीमती ______________________________________________ यांचे नामनिर्देशनपत्र *उमेदवाराने/सुचकाने/अनुमोदकाने दिनांक _________________ रोजी__________ वाजता माझ्या कार्यालयात माझ्या स्वाधीन केले. सर्व नामनिर्देशनपत्रांची छाननी (ठिकाण)_______________ येथे दिनांक______________ रोजी ______ वाजता करण्यात येईल/ The Nomination Form of Shri./Smt. ____________________________________ was delivered to me at my office at _________________(hour) on__________________ (date) by the *Candidate/Proposer/Secondar. All Nomination Forms will be taken up for scrutiny at ________________ (hour) on _____________ (date) at ______________ (place).

दिनांक / Date : __________________________ ’

*लागू नसलेले शब्द खोडावे / Strike out the word not applicable

कुलसचिव तथा निवडणूक निर्णय अधिकारी

Registrar and Returning Officer

---

**Maharashtra Public Universities Act, 2016 of Section 65:-**

No person shall be a member of Management Council or Chairman of Board of Studies, for a second consecutive term whether, as an elected, nominated or co-opted member, as the case may be:

Provided that, any person who was the member of the Management Council of the university or Chairman of the Board of Studies, for the first time whether as elected, nominated or co-opted member, as the case may be, on the date of commencement of this Act, shall not be deemed to have enjoyed the consecutive term if he is nominated or elected or co-opted for the first time after the commencement of this Act.

**महाराष्ट्र सार्वजनिक विद्यापीठ अधिनियम २०१६ चे कलम ६५:–**

व्यवस्थापन परिषदेचा कोणताही सदस्य किंवा अभ्यास मंडळाचा अध्यक्ष म्हणून, निवडूण आलेली,नामनिर्देशित केलेली, नियुक्त केलेली किंवा यथास्थिति, स्वीकृत केलेली कोणतीही व्यक्ती, लागोपाठच्या दुसऱ्या मुदतीकरता पात्र असणार नाही:

परंतु या अधिनियमाच्या पारंभाच्या दिनांकस, जी कोणतीही व्यक्ती, विद्यापीठाच्या व्यावस्थापन परिषदेची पहिल्यादां सदस्य होती—मग ती असा सदस्य किंवा अभ्यास मंडळाचा अध्यक्ष म्हणून निवडून आली असेल, नियुक्त केली असेल, नमनिर्देशित केली असेल किंवा यथस्थिति, स्वीकृत केली असेल तर—ती या अधिनियमाच्या प्रारंभानंतर, पहिल्यांदा नियुक्त केली असेल, नामनिर्देशित केली असेल, निवडूण आली असेल, स्वीकृत केली असेल तर तिने, लागोपाठच्या मुदतीकरिता लाभ घेतला असल्याचे मानण्यात येणार नाही

*****